**महाराष्ट्र शासन**
राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC)
(प्री.आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर)
हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०७०९४२ Web : www.siac.org.in ई-मेल : siac१९१५@gmail.com

---

जा.क्र.एसआयएसी/२०२५-२६/सामायिक प्रवेश परिक्षा/ दिनांक- ०८/०९/२०२५

## मुलाखत कार्यक्रम सुचना

## UnderGraduate Student (यादीमधील समावेश असलेल्या विद्यार्थ्यांसाठी)मुलाखत कार्यक्रम

सन २०२५-२६ करीता उच्च शिक्षण विभागांतर्गत सहा प्रशिक्षण केंद्रे तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील प्रशिक्षण केंद्रासाठी दिनांक २७.०७.२०२५ रोजी एकत्रित सामाईक प्रवेश परीक्षा पार पडली असून अंतीम निकाल दिनांक १८.०८.२०२५ रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रवेशासाठी एकूण १६५८ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. या कार्यालयाचे पत्र दिनांक१८.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये UnderGraduate Student (१७० विद्यार्थ्यांचा समावेश असलेली) यादी प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर यादीतील पदवी प्राप्त असलेले विद्यार्थ्यांमधून गुणानूक्रमे विद्यार्थ्यांना हमीपत्र भरुन मुलाखत संधी मिळणेकरिता आवेदन दि.२४.०८.२०२५ पर्यंत मागविण्यात आलेले होते.

त्याअनुषंगाने प्राप्त आवेदन अर्जांची छाननी करुन पात्र असणाऱ्या २५ विद्यार्थ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर यादीतील विद्यार्थ्यांचा **मुलाखत कार्यक्रम दिनांक १३.०९.२०२५** रोजी **स.१०.०० ते सायं. ०६.००** या वेळेत ऑनलाईन पध्दतीने मुंबई केंद्रामार्फत होणार असून विदयार्थ्यांना त्यांचा मुलाखत कार्यक्रम-विद्यार्थ्यांची यादी, दिनांक, वेळ यांचे वेळापत्रक यासोबत पाठविण्यात येत आहे. व्हॉटसअॅप गुप लिंक, मुलाखत लिंक संबंधीत सुचना विद्यार्थ्यांना त्यांच्या मेल द्वारे प्राप्त होणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना सदर माहीती त्यांच्या प्रोफाईलवर सुदधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार दिलेल्या वेळेचे पालन करुन मुलाखतीस ऑनलाईन पध्दतीने उपस्थित रहावे. मुलाखतीकरिता विद्यार्थ्यांना सूचना/आचारसंहिता यापूर्वीच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

ज्या विद्यार्थ्यांनी हमीपत्र भरुन दिलेले आहे. तथापि, ज्यांचा मुलाखतीमध्ये समावेश झालेला नाही. असे विद्यार्थी संस्थेमार्फत भरावयाच्या जागेच्या १:३ प्रमाणात आवश्यक असलेल्या किमान गुणवत्ताधारक नसल्यामुळे त्यांचा मुलाखत यादीत समावेश करण्यात आलेला नाही, याची नोंद घ्यावी.

सोबत-

१.विदयार्थ्यांची यादी

**सही/-**
**(डॉ. भावना पाटोळे )**
**संचालक,राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई**
**तथा समन्वयक, एकत्रित सामायिक प्रवेश परीक्षा**